



# प्रीतिसंगम


www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर









वर्ष २९ वे | अंक २७३ | पाने ४ | शनिवार | दि. १५ नोव्हेंबर २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५


# बिहारमध्ये पुन्हा एनडीए सरकार ;महागठबंधनचा सुपडासाफ

## बिहारमध्ये नरेंद्र मोदी-नितीश कुमार जोडीला बिहारच्या मतदारांचा जनादेश, एनडीए २०० पार



**पाटणा/वृत्तसंस्थाः-**

बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल आज जाहीर होत असून, भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) ने निर्विवाद वर्चस्व मिळवत तब्बल २०२ जागा जिंकून इतिहास रचला आहे. महाआघाडीला धूळ चारत मिळवलेला हा विजय ऐतिहासिक असून देशभर याचा भाजपा कार्यकत्यांनी जल्लोष साजरा केला. आजच्या या निकालामध्ये सर्वात मोठा पक्ष होण्याचा मान ८९ जागा जिंकत भाजपाने मिळवीला आहे. तर जेडीयूने ८५ जागा जिंकून आपला दावा कायम ठेवला आहे. मुख्यमंत्री पदासाठी हालचाली सुरू झाल्या असून आता बिहारचा मुख्यमंत्री कोण होणार? यावर राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण असले तरी जेडीयूचे नेते आणि विद्यमान मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्याच नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या निकालानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपा कार्यालयात जावून आता कट्टा सरकार कधीच येणार नाही. असे सांगत जल्लोष साजरा केला आहे.

### काँग्रेस नकारात्मक राजकारणात बुडवत आहे:पंतप्रधान

काँग्रेस आता मुस्लिम लीग-माओवादी काँग्रेस किंवा एमएमसी बनली आहे. ही एमएमसी आहे आणि तिचा संपूर्ण अजेंडा त्याच्याभोवती फिरतो. तिच्यात एक वेगळा गट उदयास येत आहे, जो नकारात्मक राजकारणापासून दूर जात आहे. हा गट मोठ्या नावांच्या विरोधात आहे आणि त्यांच्याबद्दल तीव्र निराशा वाढत आहे. भविष्यात, काँग्रेसला आणखी एक मोठी फूट पडू शकते. तिच्या मित्रपक्षांनाही आता हे समजत आहे की काँग्रेस सर्वांना त्याच्या नकारात्मक राजकारणात बुडवत आहे. आम्ही बिहार आणि देशाचा विकास करू. देशावर दशके राज्य करणाऱ्या पक्षावरील जनतेचा विश्वास सातत्याने कमी होत आहे. काँग्रेस अनेक राज्यांमध्ये वर्षानुवर्षे सत्तेबाहेर आहे. बंगालमध्ये काँग्रेस गेल्या ५० वर्षांपासून सत्तेत परत आलेली नाही. सलग तीन लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला तीनही जागा जिंकता आल्या नाहीत.



# बिहार विधानसभा निवडणुकीतील विजयाचा साताऱ्यात जल्लोष

### मंत्री शिवेंद्रसिंह राजे यांची उपस्थिती, मोती चौकात कार्यकर्त्यांकडून पेढे वाटप

**सातारा/प्रतिनिधीः-**

बिहार राज्याच्या विधानसभा निवडणुकी भारतीय जनता पार्टीने मोठा विजय मिळवला .या विजयाचा जल्लोष साताऱ्यामध्ये प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत करण्यात आला .येथील मोती चौकामध्ये सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या उपस्थितीत पेढे वाटप करण्यात आले.

भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणीच्या उपाध्यक्ष सुवर्णाताई पाटील पालिकेतील भाजपच्या माजी पक्षप्रतोद सिद्धी पवार सुनिषा शहा अविनाश चिखलीकर विजय काटवटे सरचिटणीस विठ्ठल बलशेठवार विकास गोसावी इत्यादी यावेळी उपस्थित होते .येथील मोठी चौकात सायंकाळी उशिरा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आगमन झाले त्यावेळी कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला .महिला सदस्यांनी शिवेंद्रसिंहराजे



यांना पेढा भरून त्यांचे तोंड गोड केले.

शिवेंद्रसिंहराजे भोसले यावेळी बोलताना म्हणाले देशाचे यशस्वी पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्व अंतर्गत बिहारमध्ये भाजप प्रणित इंडिया आघाडीचा झालेला विजय हा ऐतिहासिक स्वरूपाचा आहे .हा विकसित भारताच्या मोदीजींच्या शाश्वत स्वप्नांचा परिणाम आहे .जगात भारताला महासत्ता बनवण्याच्या दृष्टीने केलेल्या संघटित प्रयत्नांचा हा विजय आहे .हा विजयाचा रथ यापुढे असाच दौडत राहणार आहे आपण सर्वांनी संघटितपणे या प्रयत्नाला साथ देऊया असे आवाहन त्यांनी केले.

### दारूच्या नशेत गळफास लावून घेत संपवले जीवन

**सातारा/प्रतिनिधीः-**

पाटखळमाथा येथे सचिन वसंत महापुरे(वय३९) यांनी दारूच्या नशेत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. त्यांना उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.घटनेची माहिती सुनील वसंत महापुरे(वय ४२) यांनी तालुका पोलिसांत दिली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

तर दुसऱ्या घटनेत खेड येथील अक्काबाईचा मळा येथील नदीच्या कडेला असलेल्या करंजाच्या झाडाला दोरीच्या साहाय्याने नितीन श्रीधर जाधव (वय ५६) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली.याची फिर्याद उद्धव श्रीधर जाधव(वय ४९) यांनी सातारा शहर पोलिसांत दिली आहे.अधिक तपास पोलीस हवालदार यादव करत आहे.

# मलकापूरात भांडी-फर्निचर दुकानाच्या आमिषाने फसवणूक

## शटर तोडून गुंतवणूकदारांचा ताबा ;पोलीस ठाण्यात नागरिकांनी नोंदवल्या तक्रारी

**कराड/प्रतिनिधीः-**

आगाशिवनगर (मलकापूर), ता. कराड येथे परप्रांतीय व्यक्तींनी अवाजवी सवलतीचे आमिष दाखवून शेकडो नागरिकांची लाखोंची फसवणूक केली आहे. ही घटना शुक्रवारी सकाळी उघड झाली. 'सोना ट्रेडर्स' या भांडी, फर्निचर व इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या दुकानात २५ ते ५० टक्के डिस्काउंटच्या आश्वासनावर आगाऊ रक्कम घेण्यात आली. दुकान बंद आढळताच संतप्त गुंतवणूकदारांनी शटर तोडून मिळेल ती वस्तू लंपास केल्याची घटना आज सकाळी घडली.

आगाशिवनगरातील वृंदावन कॉलनीमध्ये हे दुकान गेल्या महिन्यात सुरू झाले होते. काही ग्राहकांना सुरुवातीला वस्तू देत विश्वास संपादन करण्यात आला. त्यामुळे बुकिंग वाढत जाऊन सुमारे ७०० ते ८०० जणांनी आगाऊ रक्कम जमा केली. प्रत्येक वस्तूसाठी पूर्ण आगाऊ भरल्याची पावती ग्राहकांकडे आहे.

गुरुवारी रात्री दुकान बंद केल्यानंतर मध्यरात्री ते थोडावेळ उघडून पुन्हा बंद केल्याचे स्थानिकांनी पाहिले. शुक्रवारी सकाळी ठरलेल्या वेळेत दुकान न उघडल्याने ग्राहकांनी गर्दी केली आणि व्यापारी फरार झाल्याची शंका बळावली. त्यानंतर संताप नागरिकांनी दुकानाचे कुलूप तोडून आत प्रवेश करीत उपलब्ध वस्तू उचलण्याची चढाओढ केली. यावेळी काहींमध्ये बाचाबाचीही झाली.



घटनेनंतर अनेक गुंतवणूकदारांनी कराड शहर पोलीस ठाण्यात तक्रारी नोंदवल्या आहेत. पोलिसांनी तपास सुरू केला असून, संबंधित परप्रांतीय व्यक्तींचा शोध सुरू करण्यात आला आहे.

# 'सह्याद्रि'चा ३५०० रुपये ऊस दर जाहीर

**कराड/प्रतिनिधीः-**

यशवंतनगर, ता. कराड येथील सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याने सन २०२५-२६ ऊस गळीत हंगामासाठी प्रति मेट्रिक टन ३५०० असा समाधानकारक ऊस दर जाहीर केला आहे. कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक सभासदांनी आपल्या कष्टाने पिकविलेला ऊस सह्याद्रि कारखान्याकडेच दाखल करून सहकार्य करावे, असे आवाहन चेअरमन पाटील यांनी केले. सह्याद्रि कारखाना शेतकरीहितासाठी कटिबद्ध असून, नेहमीच रास्त व स्थिर ऊस दर देण्याची परंपरा राखून आहे, असेही त्यांनी नमूद केले.

यंदाच्या हंगामात जाहीर झालेला



३५०० प्रति मे.टन दर हा शेतकरी हिताचा निर्णय ठरला असून, त्यामुळे ऊस उत्पादक सभासदांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे. सह्याद्रि कारखान्याच्या या घोषणेचे शेतकरी बांधवांकडून स्वागत होत आहे.

# आजअखेर नगराध्यक्ष पदासाठी २, तर नगरसेवक पदासाठी २७ अर्ज दाखल

### मलकापूर नगरपालिका निवडणूक ;सोमवारी शेवटचा दिवस

**कराड/प्रतिनिधीः-**

मलकापूर नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी शुक्रवारी नगराध्यक्ष पदासाठी १, तर नगरसेवक पदासाठी ११ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून, आजअखेर नगराध्यक्ष पदासाठी २ आणि नगरसेवक पदासाठी एकूण २७ अर्ज झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार कल्पना ढवळे, तसेच सहायक अधिकारी कपिल जगताप व ज्ञानदेव साळुंखे यांनी दिली.

शुक्रवार, दि. १४ रोजी मलकापूर नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी सूर्यकांत दिलीपकुमार खिलारे यांनी भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर नगरसेवक पदासाठी विविध



प्रभागांतून आलेले प्रभागनिहाय उमेदवारी अर्ज पुढीलप्रमाणे; प्रभाग १ (सर्वसाधारण जागा) : नितीन उर्फ नारायण विष्णुपंत काशीद-पाटील - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), प्रभाग २ (सर्वसाधारण महिला) : वंदना दत्तात्रय साळुंखे - भारतीय जनता पक्ष, प्रभाग ४ (अनुसूचित जाती) : सुनील प्रल्हाद खैरे - भारतीय जनता पक्ष, प्रभाग ५ (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव) : मृणालिनी अमर इंगवले - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, तर याच प्रभागातील सर्वसाधारण जागा : दादासो बाबू शिंगण - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीअमर

पान ४ वर

# नगराध्यक्षपदासाठी अध्याप एकही अर्ज नाही

### पाचव्या दिवशी १४ अर्ज दाखल, एकूण २० उमेदवारांचे २३ अर्ज

**कराड/प्रतिनिधीः-**

कराड नगरपालिकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. १४ रोजी अर्ज दाखल करण्याच्या पाचव्या दिवशी १४ अर्ज दाखल झाले. यांसह आतापर्यंत एकूण २० उमेदवारांचे २३ अर्ज दाखल झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे यांनी दिली. विशेष म्हणजे, निवडणुकीची प्रक्रिया सुरू होऊन पाचव्या दिवसअखेर नगराध्यक्षपदासाठी अद्याप एकही अर्ज दाखल झालेला नाही.

निवडणूक निर्णय अधिकारी अतुल म्हेत्रे व सहाय्यक अधिकारी प्रशांत व्हटकर यांच्या उपस्थितीत इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले नामनिर्देशन अर्ज दाखल केले. शुक्रवारी दाखल झालेल्या अर्जांची प्रभागनिहाय माहिती पुढीलप्रमाणे; प्रभाग ३ अ (सर्वसाधारण महिला) : पवार ज्योती अधिकराव (अपक्ष), प्रभाग ४ अ (सर्वसाधारण महिला) : मोहिते स्वाती रमेश (भाजप), प्रभाग ४ ब (अनुसूचित जाती) : रामुगडे शिवाजी कांतीसुरत (भाजप), प्रभाग ७ ब (सर्वसाधारण) : कुलकर्णी अजय अरविंद (अपक्ष), प्रभाग ८ ब (नागरिकांचा मागास प्रवर्ग) : विभूते विनायक शिवलिंग (भाजप), प्रभाग ९ अ (सर्वसाधारण महिला) : साळुंखे विद्याराणी घनश्याम (लोकशाही आघाडी



कराड शहर), प्रभाग ९ ब (सर्वसाधारण) : साळुंखे प्रताप घनश्याम (लोकशाही आघाडी कराड शहर), प्रभाग १० ब (सर्वसाधारण) : भोपते विक्रम राजाराम (भाजप), प्रभाग ११ ब (सर्वसाधारण) : रैनाक प्रसाद नरेंद्र (भाजप), प्रभाग १३ अ (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला) : हूलवान स्मिता रवींद्र (भाजप), प्रभाग १३ ब (सर्वसाधारण) : शाह निखिल प्रमोद (भाजप), शाह गिरीश बाबूलाल (भाजप), प्रभाग १४ अ (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला) : भोंगाळे प्रियांका दत्तात्रेय (अपक्ष), प्रभाग १४ ब (सर्वसाधारण) : पवार महादेव बळवंत (भाजप) यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

पान ३ वर

## संगीत खुर्ची..

चपला आहेत कमी
पुष्कळ तिष्ठत पाय
जिकडे जमले जोड
तिकडे सरळ जाय
बुकींगआधीचं फुल
प्रश्न करायचे काय
लोणी रात्री पळवले
भाकर कोरडी खाय
स्वकीयांने नाकारले
पुन्हातसाचं अन्याय
न्याय यात्रेत चाललो
हरवून बसलो न्याय
दुसरा घरोबा चांगला
ठेवला नाही रे पर्याय
तिकीटदेता का कुणी
करे भ्रमंती ठाय ठायं
संधीसाधूंना दे संधी
करुद्या किती अपाय
तुल्यबळचं उमेदवार
नको पक्षाला अपाय
पत्रकारचॅनेल गोंधळे
खाताना बिस्कुटचाय
कॅमेरे घेऊन धावतात
हॅलो बोलो हाय हाय
उमेदवारांची फरफट
आता रे पाहवत नाय
संगीत खुर्ची खेळाची
लज्जत करा एन्जॉय

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात 'तारा'चे आगमन

## ताडोबा येथील वाघिणीचे यशस्वीरीत्या स्थानांतरण ;आठ वाघांच्या स्थानांतरण मंजुरीनंतर पहिली कामगिरी

* ताडोबा येथील T20-S-2 वाघीण सह्याद्रीत 'तारा' (STR T-04) या नव्या नावाने दाखल.
* पर्यावरण मंत्रालयाची ताडोबा-पेंचमधून ८ वाघांचे सह्याद्रीत स्थानांतरणास मंजुरी.
* ऑपरेशन तारा अंतर्गत पहिला यशस्वी टप्पा.
* NTCA मार्गदर्शक तत्वांनुसार सुरक्षित पकड व संपूर्ण वैद्यकीय तपासणी.
* ताडोबा ते सह्याद्री १००० किमीचा २७ तासांचा नियंत्रित आणि सुरक्षित प्रवास.

**कराड/प्रतिनिधीः-**

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील व्याघ्र पुनर्स्थापन उपक्रमाला मोठे यश मिळाले असून, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील T20-S-2 ही 'तारा' (STR T-04) हे नवीन नाव मिळालेली तरुण वाघीण यशस्वीरीत्या सह्याद्रीत दाखल झाली आहे. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने ताडोबा आणि पेंच येथील एकूण आठ वाघांचे सह्याद्रीत स्थानांतरण करण्यास दिलेल्या मंजुरीनंतर ऑपरेशन तारा अंतर्गत ही पहिली मोठी कामगिरी पार पडली.

ही मोहीम भारतीय वन्यजीव संस्था (WII) यांच्या वैज्ञानिक मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. जवळपास तीन वर्षांची ही तंदुरुस्त वाघीण छढउ- च्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांनुसार ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील खडसांगी परिक्षेत्रातून सुरक्षितरीत्या पकडण्यात आली. पकडल्यानंतर तिला आवश्यक अशा सर्व वैद्यकीय तपासण्या करून, विशेष तयार केलेल्या वन्यजीव वाहतूक वाहनातून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाकडे रवाना करण्यात आले.

बुधवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता मोहीम सुरू झाली आणि सायंकाळी ५ वाजता ताऱ्याला यशस्वीरित्या पिंजर्याकत बंदिस्त करण्यात आले. कागदपत्रांची पूर्तता आणि आरोग्य तपासणीनंतर रात्री १० वाजता कराडमार्गे चांदोलीकडे प्रवास सुरू झाला. २७ तासांचा १००० किमीचा प्रवास पूर्ण करत शुक्रवारी रात्री १.३० वाजता ताऱ्याला चांदोली येथे आणण्यात आले. आणखी एकदा आरोग्य तपासणी करून पहाटे ३.२० वाजता सोनारली एनक्लोजरमध्ये तिला सॉफ्ट रिलीज करण्यात आले. आता पुढील काही दिवस अनुकूलता निरीक्षणाखाली घेऊन झाल्यानंतर तिला हळूहळू जंगलात सोडण्याची प्रक्रिया पार पाडली जाणार आहे.

> ऑपरेशन तारा हा सह्याद्रीसाठी ऐतिहासिक टप्पा आहे. सॉफ्ट रिलीजमुळे वैज्ञानिक पुनर्स्थापनेची प्रक्रिया सुरू झाली असून, आम्ही सातत्यपूर्ण निरीक्षणाद्वारे सक्षम व्याघ्र अधिवास उभारण्यास कटिबद्ध आहोत.
> **- तुषार चव्हाण**
> **(क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प)**

> सह्याद्रीतील व्याघ्र पुनर्स्थापनेसाठी हे स्थानांतरण महत्त्वाचा मैलाचा दगड आहे. ताडोबा व सह्याद्री पथकांचे समन्वित व वैज्ञानिक कार्य प्रशंसनीय आहे.
> **- एम. एस. रेड्डी**
> **(प्रधान मुख्य वन्यजीव संरक्षक, महाराष्ट्र)**

या मोहिमेत क्षेत्र संचालक तुषार चव्हाण, विभागीय वनाधिकारी स्नेहलता पाटील, सहाय्यक वनसंरक्षक संदेश पाटील व बाबासाहेब हाके, वनक्षेत्रपाल ऋषीकेश पाटील, प्रदीप कोकितकर, किरण माने, संग्राम गोडसे, मानद वन्यजीव रक्षक रोहन भाटे, वन्यजीव संशोधक आकाश पाटील व संपूर्ण



पथकाने कौशल्यपूर्ण समन्वय साधून मोलाची भूमिका बजावली.

विशेषतः वनक्षेत्रपाल संग्राम गोडसे आणि वन्यजीव संशोधक आकाश पाटील यांनी वाघीण निवड, पकड, वैद्यकीय तपासण्या ते सह्याद्रीत सुरक्षित स्थलांतर या पूर्ण प्रक्रियेत महत्त्वाची जबाबदारी पार पाडली.

वन विभागाने यापुढेही अधिवास सुधारणा, निगराणी आणि वैज्ञानिक पद्धतींच्या सहाय्याने सह्याद्रीला सक्षम व्याघ्र अधिवास बनविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. ताऱ्याचे आगमन हा या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

# संपादकीय

## बिहारमध्ये एनडीएचा विजय

संपूर्ण देशाचे लक्ष लागून असलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने दणदणीत विजय मिळवला. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा सत्ताधारी आघाडीने चांगली कामगिरी करीत २४३ पैकी २०० हून अधिक जिंकून जोरदार मुसंडी मारली. दुसरीकडे तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील महाआघाडीला मोठा फटका बसला. राज्यात सत्ताविरोधी लाट असूनही विरोधकांना पन्नाशीचा आकडाही गाठता आला नाही, हे विशेष होय. या अभूतपूर्व विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या अधिकृत एक्स अकाउंटवरून एक पोस्ट शेअर केली. या पोस्टमध्ये त्यांनी बिहारच्या जनतेचे आभार मानत त्यांना आश्वासनदेखील दिले आहे. ज्या बिहारमध्ये भाजपला प्रवेश नव्हता, त्याच बिहारमध्ये भाजपणे अभूतपूर्व यशाचा पराक्रम केल्याचे दिसून आले. महाराष्ट्रात जसे झाले, त्याप्रमाणेच भाजपने बिहारात आघाडी घेतली. विशेष म्हणजे प्रादेशिक पक्षांना मागे टाकून बिहारमध्ये भाजपाने यश मिळवले आहे.

बिहारमध्ये विधानसभेच्या एकूण २४३ जागा आहेत. त्यापैकी भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने २०० हून अधिक जागांवर विजयी आघाडी घेतली आहे. दुसरीकडे तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील महाआघाडीला पन्नाशीचा आकडाही गाठता आलेला नाही. बिहारमधील या अभूतपूर्व यशानंतर पंतप्रधान मोदी यांनी सायंकाळी दिल्लीतील भाजपा मुख्यालयाला भेट दिली. मुख्यालयातूनच त्यांनी बिहारच्या जनतेला आश्वासन दिले व विजयी केल्याबद्दल आभार मानले. यापूर्वी हरियाणासह महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक जिंकल्यानंतरही पंतप्रधानांनी भाजपच्या कार्यालयाला भेट दिली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या अधिकृत एक्स अकाउंटवरून एक पोस्ट शेअर केली होती. या पोस्टमध्ये त्यांनी राज्यातील जनतेचे आभार मानले आहेत. त्यांनी म्हटले आहे की, सुशासनाचा विजय झाला आहे. विकासाचा विजय झाला आहे. जनकल्याणाच्या भावनेचा विजय झाला आहे. सामाजिक न्यायाचा विजय झाला आहे. त्यांनी असेही म्हटले आहे की, बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ऐतिहासिक आणि अभूतपूर्व विजय मिळवून दिल्याबद्दल मी राज्यातील जनतेचे मनःपूर्वक आभार मानतो. हा प्रचंड जनादेश आम्हाला जनता-जनार्दनांची सेवा करण्याची आणि बिहारसाठी नव्या संकल्पाने काम करण्याची ताकद देणारा आहे. तसेच त्यांनी राज्यातील जनतेला विविध विकासकामांचे आश्वासन दिले आहे.

बिहारच्या निवडणुकीत भाजपा आणि नितीश कुमार यांच्या जनता दल युनायटेड पक्षाने प्रत्येकी १०१ जागांवर उमेदवार दिले होते; तर चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पार्टीसह एनडीएतील इतर मित्रपक्षांसाठी ४१ जागा सोडण्यात आल्या होत्या. त्यापैकी भाजपाने ९० हून अधिक जागांवर तर जेडीयूने ८० पेक्षा जास्त जागांवर आघाडी घेतली आहे. लोक जनशक्ती पार्टी जवळपास २८ जागांवर आघाडीवर असून इतर मित्रपक्षांनी चार जागांवर सरशी मिळवली. दुसरीकडे तेजस्वी यादव यांच्या आरजेडीकडे ३० पेक्षा कमी आणि काँग्रेसला जवळपास चार जागांवर आघाडी मिळाली आहे. काँग्रेसला बिहारच्या निवडणुकीत चांगली कामगिरी करता आली नाही. काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांनी वोटचोरीचा मुद्दा उठवत मतदारामध्ये प्रबोधन करणे केले होते. परंतु त्याचा राजकीय लाभ काँग्रेसला झाला नाही. भाजपने विधानसभा निवडणुकीपूर्वी ७५ हजार महिलांच्या बँक खात्यात प्रत्येकी १० हजार रुपये भरले होते. त्याचा राजकीय लाभ भाजपा व एनडीएतील पक्षांना झाला.

या निवडणुकीत मतदार कसे आहेत, याचे सर्वेक्षण करून काही निर्णय घेऊन राबवले होते, त्यामुळे मतदारांनी भाजपा व जनता दल संयुक्त पक्षांना स्वीकारलेले दिसते. एनडीएचा विजय निश्चित झाल्यानंतर सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या यावर प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. या निवडणुकीतील पराभवानंतर शिवसेनेने (उबाठा) त्यांच्या मित्रपक्षांना, प्रामुख्याने काँग्रेसला महत्त्वाचा सल्ला दिला आहे. राज्यसभा खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, देशातील विरोधी पक्षांना एक सल्ला, देशातील महिलांशी संवाद साधा. त्यांच्याशी बोलण्याव्यतिरिक्त इतर कोणताही पर्याय नाही, त्यांच्याशिवाय बदल शक्य नाही.

बिहारमध्ये यंदा एकूण ६७.१३ टक्के इतके विक्रमी मतदान झाले. परंतु, केवळ महिला मतदारांची उपस्थिती ७१.७८ टक्के होती, जी पुरुषांच्या ६२.९८ टक्के मतदानापेक्षा खूप जास्त आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये, महिलांनी पुरुषांपेक्षा १० ते २० टक्के अधिक मतदान केले आहे. सुपौलमध्ये ही तफावत सर्वाधिक असल्याचे दिसून आले. किशनगंज, मधुबनी, गोपालगंज, अररिया, दरभंगा आणि मधेपुरा येथेही अशीच तफावत नोंदवली गेली. गेल्या जवळपास १५ वर्षांपासून महिला मोठ्या संख्येने मतदान करत आहेत, पण २०२५ हे असे वर्ष ठरले आहे की , जेव्हा महिलांच्या विक्रमी सहभागाने सर्वांना आश्चर्यचकित केले. महिलांसाठी विशिष्ट प्रचार, महिलांसाठीच्या योजनांनंतर महिलांचे मत मिळवण्यात सत्ताधारी यशस्वी झाल्याचे विश्लेषण केले जात आहे. त्यावरून चतुर्वेदी यांनी विरोधकांना सल्ला दिला आहे की तुम्ही महिलांशी बोलायला हवे. मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेमुळे एनडीएला बिहारमध्ये मोठा फायदा झाल्याचे म्हटले जात आहे.

बिहारच्या विधानसभा निवडणुकीत एनडीएने घवघवीत यश मिळवले आहे. त्यांच्या या विजयाच्या मागे भाजपाची आक्रमक रणनीती आणि मोदी-नितीश जोडीचा प्रभाव दिसून आला. या विजयाचे मोठे श्रेय भाजपाचे रणनीतीकार आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना दिले जात आहे. संघटन मजबूत करण्यात आणि उमेदवारांची निवड करण्यात त्यांनी जमिनी स्तरावर महत्त्वाची भूमिका बजावली. भाजपने चाणाक्ष रणनीती आणि बूथ स्तरावरील आक्रमक व्यवस्थापन याच्या जोरावर आणखी एका राज्यात विरोधकांचा धुव्वा उडवला आहे. २०२० मध्ये भाजपाने राज्यात ७४ जागा जिंकल्या होत्या, यंदा भाजपाने बिहारच्या व्धांसभा निवडणुकीत ९० हून अधिक जागांचा आकडा गाठला. भाजपाची बिहारमधील ही आत्तापर्यंतची सर्वोच्चतम कामगिरी ठरली आहे. तर दुसरीकडे महागठबंधनची कामगिरी मात्र सुमार राहिली आहे. काँग्रेसला ५ हून कमी जागा आणि आरजेडीला २७ जागांवर समाधान मानावे लागले आहे. एनडीएचा दमदार विजय भाजपाच्या आक्रमक, अत्यंत अचूक रणनीतीचा परिणाम देखील आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लालू यादव यांच्या काळातील जंगल राजच्या मुद्द्यावर केलेली टीका या निवडणुकीत निर्णायक ठरली. मोदींचे राष्ट्रीय स्तरावरील नेतृत्व आणि नितीश कुमार यांनी जमिनी स्तरावरील केलेली कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी याचा दुहेरी फायदा झाला. भाजपाला मिळालेला हा विजय हा नक्कीच अपघाताने मिळालेला नाही, तर तो पूर्णपणे सुनियोजित होता.

# बिबट्या मानवी वस्तीत

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी कोल्हापूर येथे बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्यांची सीपीआर रुग्णालयात गुरुवारी भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्यांच्यासोबत प्रशासकीय अधिकारी होते. कोल्हापूर शहरात मंगळवारी बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्यांना वन विभागाकडून लवकरच मदत दिली जाईल, असे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहे. गुरुवारी आबिटकर यांनी सीपीआरमध्ये जाऊन जखमींची भेट घेतली. बिबट्या आता नागरी वस्तीत येऊन धडकू लागले आहेत. बिबट्यांचे वसतीस्थान जंगल आहे. परंतु जंगलात बिबट्यांना शिकार मिळेनासी होत आहे. पाण्याचा पत्ता नाही. त्यामुए बिबटे ऊसाच्या शेतात दिसून येतात. परंतु बिबट्या मानवी वस्तीत आल्यामुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले आहेत.



**अशोक सुतार**

**कृष्णाकाठ...**

कोल्हापूर शहराच्या मध्यवस्तीत नागाळा पार्क परिसरात मंगळवारी बिबट्या शिरला होता. या बिबट्याने चौघांवर हल्ला केला. यामध्ये जखमी झालेले माळी तुकाराम खोंदळ आणि शाहूपुरी पोलिस ठाण्याचे कर्मचारी कृष्णा पाटील यांच्यावर सीपीआरमध्ये उपचार सुरू आहेत. आबिटकर यांनी नुकतीच त्यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. धोक्याच्या परिस्थितीतही तुम्ही दाखविलेली तत्परता आणि धाडस कौतुकास्पदच असल्याचे आबिटकर यांनी बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या रुग्णांशी ब्लताना म्हटले. बिबट्यांच्या दहशतीमुळे गावेच्या गावे रात्री बंद असतात. कोणीही घरातून बाहेर येत नाही. वनखात्याकडे तक्रार करावी तर अधिकारी म्हणतात की, बिबट्याने कुणाला जखमी केले किंवा मारून टाकले तर आम्हाला सांगा. आम्ही सापळा आवतो. परंतु नागरिकांच्या जीवांचे काय ? असा प्रश्न अनुत्तरीत आहे.

आरोग्यमंत्री आबिटकर यांनी म्हटले आहे की , शहरात आणि परिसरात बिबट्याच्या हल्ल्यांच्या घटना घडत आहेत, ही परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी वन विभागाची बैठक लवकरच घेतली जाणार आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना करू. मंत्री महोदयांनी बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या रुग्णांकी भेट घेतली. परंतु पुणे, सातारा जिल्ह्यांत बिबट्या मानवी वस्तीत येऊन लोकांचे जीव घेतात, त्यांना जखमी करतात, यावर वन विभाग किंवा राज्य सरकारने काय उपाययोजना केली आहे हे समजत नाही. बिबट्या मानवी वस्तीत आले कसे? कारण मानवाने आपली घरे जंगलाच्या हद्दीत बांधण्यास सुरुवात केली आहे. मानवाने जंगल, अभयारण्यात मजल मारली आहे. जंगलात बिबट्यांचा अधिवास राहावा, असे वातावरण दिसत नाही. फार पूर्वी जंगलात मानव गेला तर वाघ, बिबटे त्याच्यावर हल्ले करत असत. आता मानवी वस्तीत बिबटे येत असल्याने नागरिकांना जगाने मुश्किल झाले आहे.

वाघ, बिबटे यांचा मूळ रहिवास जंगलात आहे. वन्यप्राण्यांना राहण्यासाठी तसे वातावरण वन विभागाकडून तयार केले जात आहे. परंतु बदलेले वातावरण, हवामान बदल यांमुळे बिबटे एका जागेहून दुसर्या जागेकडे स्थलांतर करत असावेत. बिबट्यांना जंगलात जगण्यासाठी काही अन्न मिळत नाही. अन्नाच्या शोधात बिबटे शहराकडे येत असावेत. बिबटे मानवी वस्तीत आल्यास त्यांना पकडून जंगलात सोडण्यासाठे आपल्याकडे तत्पर यंत्रणा नाही, असेच दिसते. जंगलात बिबट्याचे अन्न म्हणजे वन्यप्राणी पुरेसे नाहीत, असेच दिसते. जंगलात इतर वन्यप्राणी सोडल्यास वाघ, बिबटे मानवी वस्तीत येणार नाहीत, असे वाटते. बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिक जखमी होतात. या नागरिकांना आर्थ्क मदत देऊ केली तरी ती उरेसी असेल असे सांगता येत नाही. बिबट्यांमुळे ज्यांचे प्राण गेले, ते परत येणार नाहीत. एकंदर मानवी वस्तीत येणारे बिबटे हे मानव समाजाच्या त्रासाचे आणि दु:खाचे कारण बनले आहेत असेच वाटते. सरकारने नैसर्गिक जंगले वाढवावीत, असे वाटते. कारण नागरीकरणात जंगले कमी होत आहेत. डोंगर बोडके होत आहेत. हे कुणी केले ? तर मानवाने विकासाच्या नावावर डोंगर, जंगले उजाड केली, त्याचा परिणाम मानवी समाजाला भोगावा लागत आहे, असे वाटते.




# क्रांतिकारी आणि देशभक्त बिरसा मुंडा

**सौ. रेखा फणसळकर**
**कराड**


इंग्रजांविरुद्ध सशस्त्र क्रांती आणि आदिवासींच्या हक्कासाठी लढताना पत्करलेल्या हौतात्म्याने बिरसा मुंडा यांना भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अजरामर करून ठेवले. कोण होते बिरसा मुंडा? त्यांच्याविषयी थोडक्यात माहिती या लेखाच्या रूपाने करवून घेऊ.

१५ नोव्हेंबर १८७५ रोजी बिरसा मुंडा यांचा जन्म झारखंड मधील उल हातू येथे झाला. त्यांच्या आईचे नाव कर्मी हातू व वडिलांचे नाव सुगना मुंडा असे होते. त्यांचे गुरू जयपाल नागो यांच्याकडून प्राथमिक शिक्षण घेतले व जर्मन मिशनरी शाळेत प्रवेश घेण्यासाठी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. परंतु काही काळातच त्या शाळेत आदिवासी संस्कृतीची उडविली जाणारी खिल्ली बघून त्याविरुद्ध बिरसा मुंडा यांनी बंडाची भाषा बोलायला सुरुवात केली. गाईचे मांस खाण्यास विरोध केला, अशा अनेक प्रसंगामुळे त्यांना शाळेतून काढून टाकण्यात आले. बिरसा मुंडा यांना अभ्यासासोबत बासरी वाजविणे,चित्र काढणे,नृत्य,नकला ,धनुर्विद्या, नेमबाजी इ.गोष्टींची आवड होती, रामायण ,गीता अशा अनेक ग्रंथांचे वाचन केले. शिक्षणासाठी बालपणी स्विकाराव्या लागलेल्या ख्रिश्चन धर्माचा त्याग केला. आनंद पांडे यांच्या संपर्कात आल्यामुळे औषधी वनस्पतींची माहिती मिळाली, त्यांच्या प्रभावामुळे वैष्णव धर्माचा स्वीकार केला.

बिरसा मुंडा यांनी इंग्रजांच्या काळ्या धोरणांचा जाहीर निषेध केला व इ. स. १९०० मध्ये इंग्रजांविरुद्ध विद्रोह करण्याची घोषणा केली, त्यांनी समवयस्क सहकाऱ्यांची संघटना स्थापन केली. धर्मप्रसार, इंग्रज राजवटीविरुद्ध लढण्याचा व ख्रिश्चन धर्मापासून सावध राहण्याचा सल्ला लोकांना दिला. सर्वसामान्य जनतेवर अन्याय करणाऱ्या इंग्रजी अधिकारी, ठेकेदार, जमीनदार, सावकार यांच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेतला. छोटा नागपूर परिसरात ब्रिटिशाविरोधातील सरदार आंदोलनाच्या संपर्कात आले व ब्रिटिशांनी १८८२ साली बनविलेल्या वन कायद्याचा प्रखर विरोध केला. आदिवासींच्या नैसर्गिक संपत्तीवर पहिला अधिकार आदिवासींचाच हे त्यांनी ठासून सांगितले व तो मिळावण्यासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा आदिवासींना बिरसा मुंडा यांनी दिली. लोकांचे प्रबोधन करण्यास सुरुवात केली.

दि. २५ ऑगस्ट १८९५ ला त्यांना कपटाने अटक केली. दि. ३० नोव्हेंबर १८९७ ला सुटका केली. ९ नोव्हेंबर १९०० ला डोंगरी पहाडावर मोठी सभा घेतली, इंग्रजांनी सभेला आलेल्या लोकांवर गोळीबार केला. त्यात अनेक जण मरण पावले. बिरसा याना पकडण्यासाठी ५०० रु. इनाम इंग्रज सरकारने जाहीर केले, फितुरीमुळे त्यांना पकडण्यासाठी काही लोकांनी मदत केली, त्यानंतर कारस्थान करून बिरासा यांना पकडण्यात आले. दि. ९ जून १९०० रोजी तुरुंगात त्यांचा मृत्यू झाला. तुरुंगात स्लो पॉइजनिंग केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला.

बिरसा मुंडा यांच्या महान कार्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ रांची येथील कारागृहास व आंतरराष्ट्रीय विमानतळास भगवान बिरसा यांचे नाव देण्यात आले. इ.स.१८९४ मध्ये नागपूर येथे आलेल्या महामारीत बिरसा मुंडा यांनी पूर्ण निष्ठेने लोकांची सेवा केली. तेंव्हापासून लोक



त्यांना देवच मानू लागले होते, त्यांच्या या देशहितासाठी केलेल्या कार्यामुळे आजचा सुशिक्षित व आदिवासी तरुण अभिमानाने सांगत आहे की, बिरसा तुझा इतिहास तोंडी आम्ही सांगत आहोत, इतिहासाच्या कोऱ्या पानांवर,इतिहास लिहिण्यास सज्ज आहोत. देशासाठी व धर्मासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या या महान शूरवीराला कोटी कोटी प्रणाम !!!



# शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी देवेंद्र नारायणकर तर उपाध्यक्षपदी उमेश घोडके

**अक्कलकोट/प्रतिनिधी:-**

उडगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या व्यवस्थापन समिती च्या अध्यक्षपदी देवेंद्र नारायणकर तर उपाध्यक्षपदी उमेश घोडके यांची निवड करण्यात आली आहे.

अक्कलकोट तालुक्यातील उडगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी देवेंद्र नारायणकर तर उपाध्यक्ष उमेश घोडके यांची एकमताने निवड करण्यात आली.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांचे सत्कार करण्यात आले.

ही निवड प्रक्रिया मुख्याध्यापक दत्तात्रय हंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

यावेळी उपसरपंच सुनील मोरे, सिद्रया सोड्डे, प्रकाश कुंभार, शरणप्पा जिगजंबगी, उमेश कोळी, शिक्षिका पल्लवी मुर्शाळे किसन जाधव, यांच्यासह पालक, शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय बाल दिनानिमित्त झोपडपट्टी परिसरातील लहान मुलांना खाऊ चे वाटप

**अक्कलकोट/प्रतिनिधी:-**

१४ नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय बाल दिन म्हणून साजरा केला जातो व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणाऱ्या या दिनाचे औचित्य साधून शिक्षणापासून व शाळेपासून वंचित असलेल्या झोपडपट्टी परिसरातील लहान मुलांना क्रीम बिस्किट,केक,डेरी मिल्क चॉकलेट अशा गोड-धोड पदार्थ वाटून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला.

या खाऊ वाटप उपक्रमाला मोहसीन मोकाशी, अब्दुल हनान अत्तार, रशीद खिस्तके,अकीब बागवान, मुबिन अन्सारी सर, सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



झोपडपट्टी परिसरातील २५ ते ३० लहान मुलांना व महिलाना खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी सोहेल फरास, मोहसीन मोकाशी, अब्दुल हनान अत्तार, रशीद खिस्तके,अकीब बागवान, मुबिन अन्सारी सर, अशरफ गोलंदाज, अल्ताफ बागवान आदी उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

# पूरग्रस्तगावात प्रजनन आरोग्य सेवा देण्यासाठी प्रतिसाद टीम सज्ज

**सोलापूर/महेश गायकवाड:-**

सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील ४८ पूरग्रस्तगावांमध्ये (चखडझ) मिनिमम इनिशल सर्विस ऑफ पॅकेज अंतर्गत प्रजननक्षम जोडप्याना कुटुंब नियोजन साधणांचे वाटप, सुरक्षित गर्भपात, गरोदर व स्तनदा माता तपासणी, गर्भाशय व स्तानाची कॅन्सर तपासणी, एच.आय.व्ही तपासणी व समुपदेशन, लिंगभेद अन्याय व अत्याचार समुपदेशन व संदर्भ सेवा, वंधत्व निवारण, स्त्री पुरुष लैंगिक आजारावर उपचार, हिमोग्लोबिन, शुगर, व्ही.डी.आर.एल. तपासणी व सर्वसामान्य तपासणी व औषधोपचार आदी सेवा देण्यासाठी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेची आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद टीम सज्ज झाली आहे.




मिनिमम इनिशल सर्विस ऑफ पॅकेज विषयाचे प्रशिक्षण शिबिराप्रसंगी डॉ. अमित किटुकले, डॉ. एन. बी. तेली, डॉ. गौरी कहाते, डॉ. समन खान - तांबोळी, डॉ. सोनाक्षी टेकाडे यांच्यासह आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद टीमचे सदस्य दिसत आहेत.

इंटरनॅशनल प्लॅन्ड पेरेंटहूड फेडरेशन व ऑस्ट्रेलियन एड यांच्याकडून फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेला स्प्रिंट फोर सी.इ. २०२५ महाराष्ट्र पूर आपत्कालीन प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. मुंबई मुख्यालयाचे प्रकल्प व्यवस्थापक डॉ. अमित कीटूकले यांनी आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद टीम ला मिस्प सेवाविषयी या विषयी एकदिवसीय प्रशिक्षण दिले. या टीम मध्ये प्रकल्प समन्वयक, सांख्यिकी अधिकारी, समुपदेशक, एम.बी.बी.एस डॉक्टर, नर्स, लॅब टेक्निशियन व चार स्वयंसेवक असणार आहेत. महाराष्ट्र पूर आपत्कालीन प्रकल्प मुंबई मुख्यालयाच्या डायरेक्टर जनरल डॉ. कल्पना आपटे, असिस्टंट डायरेक्टर जनरल अमिता धानू, यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असणार आहे तर स्थानिक शासकीय आरोग्या यंत्रनेचे याला सहकार्य मिळणार आहे.

या प्रशिक्षण शिबिरात फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, वैद्यकीय अधिकारी डॉ. गौरी कहाते, डॉ. समन खान तांबोळी, डॉ. सोनाक्षी टेकाडे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, प्रकल्प समन्वयक स्वप्निल सोनवणे, सांख्यिकी अधिकारी मल्लिकार्जुन कडकोळ, समुपदेशिका रेखा पाटील-कपाळे, लॅब टेक्निशियन व्यंकटेश कंची, परिचारिका शकीला मणियार, अविनाश कांबळे, जिया शेख, सुनीता पाटील, कीर्ती धंगापुरे, लीला धंगापुरे, कल्पना गडगडे, आकाश गायकवाड, शाहीन मेंडूक, आशालता मस्के, रोजमेरी गायकवाड, सुकेशनी सोनकांबळे, हिशोब अधिकारी व्यंकटेश मच्छा आदी कर्मचारी उपस्थित होते.

# पुढील दशकात अदाणी समूह आंध्र प्रदेशात १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणार: करण अदाणी




विशाखापट्टणम, १४ नोव्हेंबर :-अदाणी समूह पुढील दशकात आंध्र प्रदेशात १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे, असे करण अदाणी यांनी शुक्रवारी सांगितले. आंध्र प्रदेश इन्वेस्टर समिट मध्ये बोलताना त्यांनी सांगितले की ही गुंतवणूक बंदरे, सिमेंट, डेटा सेंटर, ऊर्जा आणि प्रगत उत्पादन क्षेत्रात होईल.ही गुंतवणूक आधीच गुंतवलेल्या ४०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

अब्जाधीश गौतम अदाणी यांचे ज्येष्ठ पुत्र यांनी समूहाच्या १५ अब्ज डॉलर्सच्या विझाग टेक पार्क व्हिजनचे अनावरण केले, ज्यामध्ये गुगलसोबत भागीदारीत जगातील सर्वात मोठ्या ग्रीन-पॉवर्ड हायपरस्केल डेटा-सेंटर इकोसिस्टमपैकी एक बांधणे समाविष्ट आहे. ते म्हणाले की आंध्र प्रदेशातील सध्याच्या अदाणी ऑपरेशन्सने आधीच एक लाखाहून अधिक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण केल्या आहेत, तसेच आगामी प्रकल्पांद्वारे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीचे नियोजन आहे.

# होळीचागाव मध्ये आजपासून अखंड हरिनाम सोहळा

## श्रीसंत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळा

**पुसेसावळी/प्रतिनिधी:-**



संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळ्याचे निमित्ताने होळीचागाव(खाडेनगर) ता.खटाव याठिकाणी ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरी पारायण अखंड हरिनाम महोत्सव सोहळा शनिवार ता.१५ नोव्हेंबर ते बुधवार ता.१९ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये पहाटे काकड आरती, राम कृष्ण हरी जप,हरिपाठ,ज्ञानेश्वरी वाचन, सायंकाळी प्रवचन,रात्री ७ ते ९ किर्तन असा दिनक्रम असणार आहे.शनिवार ता.१५ नोव्हेंबर रोजी सदगुरु धुंडामहाराज देगलुरकर यांच्या कृपाआशीर्वादाने व ह.भ.प.श्रीगुरु प्रमोदमहाराज जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ह.भ.प अधिकराव खाडे यांच्या नेतृत्वाखाली ज्ञानेश्वरी वाचनास प्रारंभ करण्यात येणार आहे.हरिनाम महोत्सव काळात हभप.ज्ञानराज महाराज थोरवेवाडी,हभप.अनिकेत महाराज डुबुले,हभप.अरुण महाराज यादव मणकर्णवाडी,हभप.श्रीगुरु प्रमोद महाराज जगताप बारामती यांची किर्तनसेवा होणार असुन हभप अधिकराव खाडे महाराज यांची रोज प्रवचन सेवा होणार आहे,रविवार ता.१६ रोजी स.१० वा.मित्र परिवार स्नेहमेळावा आयोजित केला असुन यावेळी भागवताचार्य निळकंठ महाराज तावरे यांचे साधकांचा माय बाप याविषयावर प्रवचन होणार आहे.तसेच मंगळवार ता.२२ रोजी ह.भ.प भागवताचार्य निळकंठ महाराज तावरे यांचे ज्ञानेश्वर माऊली समाधी सोहळा कीर्तन व बुधवार ता.१९ रोजी काल्याचे कीर्तन हभप.श्रीगुरु प्रमोदमहाराज जगताप बारामती यांचे होईल,सप्ताह शुभारंभ प्रसंगी कलश,ज्ञानेश्वरी आणि विणा पूजन विविध मान्यवरांच्या हस्ते होणार असुन तरी होळीचागाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक बाळासो खाडे व कुंडलिक खाडे यांनी केले आहे.

# अपघात प्रकरणी पिकअप चालकावर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:-**

वाढे फाटा येथे झालेल्या पिकअप व दुचाकीच्या अपघातात दुचाकीवरील दोघेजण जखमी झाले. रफिक करीम शेख (वय ३३, रा. गोडोली) व संकेत संजयकुमार पवार (वय ३४, रा. गोडोली) असे जखमी झालेल्या दोघांची नावे आहेत. ही घटना दि. ६ नोव्हेबर रोजी घडली आहे. सातारा शहर पोलिस ठाण्यात पिकअप चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.



# ग्लोबल व्हिलेजच्या गौरी पाटील ची राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर/प्रतिनिधी:-**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे व अहमदनगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुणे विभागीय तलवारबाजी (Fencing) स्पर्धेत कै . ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित, ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल (सी बी एस ई), बोरामणी येथील इयत्ता नववीची विद्यार्थिनी कु. गौरी विश्वपुत्र पाटील हिने

फेंसिंग या खेळ प्रकारातील अंडर-१७ गटात उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करत द्वितीय क्रमांक पटकावला असून, तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही राज्यस्तरीय स्पर्धा दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ पासून विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडत आहेत

कु. गौरीला क्रीडा शिक्षक श्री. रमेश दोडमनी व विनायक गोविंदे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी व सचिवा सौ. संगिता शहा, उपाध्यक्ष प्रा. अनिकेत चनशेट्टी,प्राचार्या आसमा नदाफ, अधीक्षक मल्लिनाथ जळकोटे यांनी कु. गौरी व मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# भाजपने शास्त्रीय प्रक्रिया राबवून नगराध्यक्षपदाचे नाव केले जाहीर

## ना.चंद्रकांत पाटील;विश्वनाथ डांगे यांचा नगराध्यक्ष पदाचा अर्ज दाखल

**ईश्वरपूर/प्रतिनिधी:–**

भारतीय जनता पार्टीने शास्त्रीय प्रक्रिया राबवून राज्यातील ९० टक्के नगराध्यक्ष पदाची नावे घोषित केली आहेत. उरुण– ईश्वरपूर नगराध्यक्ष पदाचा भाजपचा पहिला अर्ज भरला आहे. महायुतीच्या सर्व नेत्यांनी मिळून एकमत करून एकच नाव दिले आहे. २०४७ सालापर्यंत भारत देश जगात एक नंबर वर नेण्याचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे असल्याचे सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले .

नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विश्वनाथ डांगे यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी आ.सत्यजित देशमुख, आ. सदाभाऊ खोत, सांगली जिल्हा बँकेचे संचालक राहुल



महाडिक, जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, शिवसेना जिल्हाप्रमुख आनंदराव पवार, राष्ट्रवादी जिल्हाप्रमुख निशिकांत पाटील, एड.चिमण डांगे, माजी उपनगराध्यक्ष जयवंत पाटील, प्रसाद पाटील, अजित पाटील, सतेज पाटील, विजय पवार, संदीपराज पवार, अजित पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

ना. चंद्रकांतदादा पाटील म्हणाल, बिहारच्या यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राज्याच्या वतीने अभिनंदन करतो . पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सातत्याने लोकप्रियता वाढत चालली आहे. लोकसभा, विधानसभा, स्थानिक संस्था निवडणुका, मोदींच्या नावाने लढवल्या जाणाऱ्या सर्व निवडणुकामध्ये यश मिळत आहे.भाजप वरील लोकांचा विश्वास वाढत आहे. इस्लामपूरच्या भुयारी गटार योजनेसाठी १९८ कोटी, २४ बाय ७ पाणीपुरवठा योजनेसाठी १२४ कोटी रुपये मंजूर केले आहेत. मंत्री तलाव सुशोभीकरणासाठी ३ कोटी रुपये मंजूर आहेत. बाजार कट्ट्याचे काम सुरू आहे त्यासाठी ५२ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे . महायुती सरकारने इस्लामपूरचे ईश्वरपूर नाव केले आहे. कोल्हापूर खंडपीठ मंजूर केले आहे. लाडकी बहीण योजना कायमस्वरूपी सुरू राहणार आहे .दहा लाख बेरोजगार तरुणांना दरमहा दहा हजार रुपये शासन देत आहे . पाच ते साडेसात एचपी मोटरचे वीज बिल शासनाने पूर्णपणे माफ केली आहे. महिला सक्षम झाल्या तरच समाज सक्षम होणार आहे

चंद्रकांतदादा पाटील पुढे म्हणाले, उरुण– ईश्वरपुर शहरातील पेंडिंग विकास कामे , भावनिक विषय सोडवणार आहे. इस्लामपूर चे उरुण– ईश्वरपूर करण्यासाठी महायुतीची टीम दिल्लीपर्यंत काम करत होती. ळआमदार सदाभाऊ खोत मंत्री असताना कृषी महाविद्यालय मंजूर करून आणले आहे त्या महाविद्यालयाला क्रांतीसिंह नाना पाटील यांचे नाव देऊन त्याच ठिकाणी त्यांचा पूर्णकृती पुतळा उभा करणार आहोत.



# भाजपा सांगली शहर जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**सांगली/ प्रतिनिधी:–**

भाजप सांगली शहर जिल्हा कार्यकारिणी आज जाहीर करण्यात आली. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना निवडपत्रांचे वितरण आणि मावळत्या पदाधिकाऱ्यांचा गौरव सोहळा दिमाखात संपन्न झाला. या सोहळ्याला जिल्ह्यातील सर्वच कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सुधीरदादा गाडगीळ होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री व मिरज विधानसभा आमदार सुरेशभाऊ खाडे उपस्थित होते.

आमदार सुधीरदादा गाडगीळ यांनी आपल्या भाषणात सांगलीतील चालू प्रकल्प, भविष्यातील विकासयोजना आणि पक्षाच्या मजबूत संघटनशक्तीवर प्रकाश टाकला. त्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना सक्रियतेने जनतेत जाण्याचे तसेच सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहिती घराघरात पोहोचवण्याचे आवाहन केले.

आमदार सुरेशभाऊ खाडे यांनी सांगितले की, भाजपा ही कार्यकर्त्यांची पार्टी असून संघटनेचा पाया हा कार्यकर्त्यांच्या निष्ठेवर आणि कष्टांवर उभा आहे. सांगली जिल्ह्यात पक्षाची ताकद वाढवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे असल्यावर त्यांनी भर दिला. कार्यक्रमाला भाजपा पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे, भाजपा सांगली शहर जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग, माजी आमदार नितीनराजे शिंदे, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य सौ. निताताई केळकर, भाजपा महिला मोर्चा प्रदेश सरचिटणीस स्वातीताई शिंदे, भाजपा किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष पृथ्वीराज पवार, तसेच सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, माजी नगरसेवक, बूथ व शक्तीकेंद्र प्रमुख आणि मोठ्या संख्येने भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

# विट्यातील आय.टी.आय.कॉलेज जवळील गायवासरावरील हल्ला बिबट्याचा नाही

## वनक्षेत्रपाल वन अधिकारी विलास पवळे

**विटा/प्रतिनिधी:–**

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा शहरात विटा लेंगरे रोड लागत बोडरे वस्तीसह त्या भागात बिबट्याने रात्रीच्या वेळी घराबाहेर बांधलेल्या कुत्र्यावर झडप घालून हल्ला करत त्या कुत्र्याला ठार केले होते. यावेळी हा हल्ला रात्री ११ वाजण्याच्या सुमारास झाला होता. या वेळी लोकप्रतिनिधीसह अनेक पदाधिकारी व वनक्षेत्रपाल वन अधिकारी विलास पवळे सह अधिकारी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली व या संदर्भात आजूबाजूच्या नागरिकांकडून माहिती घेतली. तसेच बोडरे वस्ती या परिसरात कुत्र्यावर हल्ला करणारा प्राणी बिबट्या असल्याचे वन अधिकारी यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्या परिसरात नागरिकातून बिबट्याने गायवासरावर हल्ला केल्याचे सर्वत्र चर्चा पसरली.

या घटनेची माहिती वनक्षेत्रपाल खानापूर विटा विलास पवळे व संबंधित अधिकारी यांना दिल्यानंतर त्यांनी रात्रीच्या वेळी घटनास्थळी धाव घेतली व सदर गाई वासरावर हल्ला झालेला त्याची पाहणी करत हा हल्ला बिबट्याने केला नसल्याचे स्पष्ट केले आहे.

बोडरे वस्ती या परिसरात कुत्र्यावर हल्ला करणारा प्राणी बिबट्या असल्याचे वन अधिकारी यांच्या लक्षात आले. कुत्र्याच्या रक्तात बिबट्याच्या पायाचे ठसे दिसून आले होते. यावेळी त्या परिसरात वन अधिकारी, कर्मचारी, नगरपालिका अधिकारी, कर्मचारी यांनी सर्वत्र या बिबट्याचा शोध घेतला पण बिबट्या मिळून आला नाही. गेली दोन ते तीन दिवस त्या परिसरात तसेच दत्तनगर परिसरात या बिबट्याचा वन अधिकारी शोध घेत आहेत. त्यानंतर सामाजिक कार्यकर्ते पोलीस मित्र पत्रकार शिराज शिकलगार यांनी त्या परिसरात स्पीकरवरून वन अधिकारी, पोलीस प्रशासन व नगरपालिका प्रशासन, प्रशासकीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जनजागृती करत नागरिकांनी बिबट्यापासून संरक्षण कसे घ्यावे खबरदारी कोणती घ्यावी या संदर्भात जनजागृती त्या परिसरात गेली



दोन दिवस करत होते.

त्यानंतर गुरुवारी रात्री आयटीआय कॉलेज, साळशिंगे रोड येथे एका गायीच्या वासरावर तेथील नागरिकांच्या निदर्शनास आला की, गायीच्या वासरावर हल्ला झाला. त्यानंतर त्या परिसरात नागरिकातून बिबट्याने गायवासरावर हल्ला केल्याची सर्वत्र चर्चा पसरली. या घटनेची माहिती वनक्षेत्रपाल खानापूर विटा विलास पवळे व संबंधित अधिकारी यांना दिल्यानंतर त्यांनी रात्रीच्या वेळी घटनास्थळी धाव घेतली व सदर गाई वासरावर हल्ला झालेला त्याची पाहणी करत त्यांनी स्पष्टीकरण देत, हा हल्ला बिबट्याने केला नसून अन्य प्राण्याचा आहे की? आणि काय यासंदर्भात त्या गाई वासराचे पीएम करून पुढील माहिती डॉक्टरकडून घेतली जाईल की हा हल्ला बिबट्याने केला आहे की अन्य प्राण्याने. या संदर्भात डॉक्टरने आवाहल दिल्यानंतर समजेल. तरीसुद्धा वनक्षेत्रपाल वन अधिकारी विलास पवळे व त्यांच्या टीमने त्या परिसरात सुद्धा सतर्कता घेण्याचे आदेश देत सर्वत्र पाहाणी केली. नागरिकांनी घाबरून जाऊ नये.

# वयगाव ग्रामपंचायतीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत बंधाऱ्याचे बांधकाम

## पाणी साठवणीस नवी दिशा मिळणार

**वाई/प्रतिनिधी:–**

वाईच्या पश्चिम भागातील वयगाव ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागातून ओढ्यावर बंधारा बांधण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. हा उपक्रम मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत दर मंगळवारी आयोजित होणाऱ्या श्रमदानाच्या माध्यमातून राबविण्यात आला असून, त्यातून गावाच्या पाणी साठवणीला नवी दिशा मिळणार आहे.

या उपक्रमासाठी वाईचे कर्तव्यदक्ष आणी विकासाची दुरदृष्टी असणारे वाई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विजयकुमार परीट यांच्या मार्गदर्शना खाली हा नाविन्यपूर्ण उपक्रम पार पडला . ग्रामपंचायतीच्या सहकार्याने आणी ग्रामस्थांच्या एकीच्या बळावर व श्रमदानातून बंधाऱ्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. या स्तुत्य उपक्रमाला आवर्जून उपस्थित राहून प्रोत्साहन देणाऱ्या वाई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या सुविध्य पत्नी सौ . रूपाली परीट यांच्या उपस्थितीमुळे ग्रामस्थांमध्ये उत्साह निर्माण झालेला दिसुन येत होता. या बंधाऱ्यामुळे गावातील ओढ्यात पाण्याचा साठा होणार असून, उन्हाळ्यातील पाण्याची टंचाई कमी होईल. साठवलेल्या पाण्यामुळे शेतकऱ्यांना पिकांसाठी आवश्यक सिंचन मिळणार आहे, तसेच



परिसरातील विहिरी व बोरवेलमधील पाणीपातळी वाढणार आहे. गावातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अधिक नियमित व सक्षम होईल.

ग्रामपंचायतीच्या या उपक्रमामुळे वयगाव हे गाव पाणी अडवा – पाणी जिरवा या संकल्पनेचा आदर्श नमुना ठरणार आहे. ग्रामस्थ आणि स्थानिक प्रशासन यांच्या संयुक्त सहकार्याने जलसंवर्धनाचे हे कार्य भविष्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यास निश्चितच सहाय्यक ठरणार आहे.


# ग्रीन पॉवर शुगर्स प्रतिटन ३३०० दर जाहीर: संग्रामसिंह देशमुख

**कडेगांव/प्रतिनिधी:–**

ग्रीन पॉवर शुगर्स गोपूज साखर कारखान्याने चालू गळीत हंगाम २०२५/२६ साठी प्रति टन ३३०० रुपये दर जाहीर केला आहे.कारखान्याने शेतकरी केंद्रबिंदू मानून अल्पावधीतच शेतकरी सभासदांचा विश्वास कमावला आहे.

शेतकऱ्यांनी आपला ऊस ग्रीन पॉवर शुगर कारखान्यास पाठवून सहकार्य करावे असे आव्हान कारखान्याचे मुख्य प्रवर्तक सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संग्रामसिंह देशमुख यांनी केले.

पुढे बोलताना ते म्हणाले चालु गळीत हंगामात गाळपास येणाऱ्या उसास चागला दर देण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून देशात प्रथम क्रमांकाचा पारदर्शक



कामकाजाचा कारखाना होण्यासाठी सर्व अधिकार व कामगार यांना योग्य सुचना देण्यात आल्या असून कारखान्याने ६ लाख मॅट्रिक टन उसाचे गाळपाचे उद्दिष्ठ असल्याचे देशमुख यांनी सांगितले.

# बिहार विजय ; सांगलीत भाजपकडून जल्लोष

## विकासाच्या राजकारणावर जनतेचा विश्वास: आ. गाडगीळ

**सांगली/ प्रतिनिधी:–**

बिहार विधानसभेच्या ताज्या निकालांनी देशातील राजकीय वातावरणाला नवचैतन्य प्राप्त झाले असून, राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) मिळविलेला अभूतपूर्व विजय हा विकासाच्या राजकारणावर जनतेने व्यक्त केलेला ठाम विश्वास असल्याचे मत भाजपचे आमदार सुधीर गाडगीळ यांनी व्यक्त केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या संयुक्त नेतृत्वाला मिळालेला हा जनादेश सशक्त भारताच्या दिशेने देशाची मजबूत पावले असल्याचे आ. गाडगीळ यांनी व्यक्त केले.



या विजयाचा आनंद सांगलीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भाजप सांगली शहर जिल्हा आणि भाजप सांगली विधानसभा क्षेत्राच्या वतीने आमदार सुधीर गाडगीळ यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर जल्लोष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. दुपारनंतरच कार्यकर्त्यांची गर्दी कार्यालयाच्या परिसरात वाढत गेली आणि निकाल स्पष्ट होताच विजयी घोषणा, ढोल–ताशे, फटाक्यांची आतषबाजी आणि आनंदाचा महापूर उसळला. परिसरात भारत माता की जय, नरेंद्र मोदी जिंदाबाद, एनडीए विजयालाच जय अशा घोषणा घुमत होत्या.

विजय उत्सवात सहभागी झालेल्या पदाधिकाऱ्यांनी बिहारच्या सुजाण जनतेप्रती कृतज्ञता व्यक्त करताना, हा निकाल देशाच्या विकासाभिमुख राजकारणाला मिळालेला जनादेश असल्याचे सांगितले.

सांगलीतील या जल्लोष सोहळ्याने एनडीएच्या विजयाची छटा शहरातही उमटली असून, पुढील काळात केंद्र आणि राज्य पातळीवरील विकास प्रकल्पांना मिळणारी गती बिहारप्रमाणेच महाराष्ट्रातही दिसून येईल असा विश्वास भाजप पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस विश्वजीत पाटील, स्मिता भाटकर, जिल्हा उपाध्यक्ष शरद देशमुख, विजय साळुंखे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ.स्वातीताई खाडे, सौ.सुमनताई सुरेशभाऊ खाडे, सौ.मंजिरी गाडगीळ, सर्व माजी नगरसेवक, जिल्हा पदाधिकारी, मंडलाध्यक्ष, मंडल पदाधिकारी, बूथ प्रमुख, शक्तिकेंद्र प्रमुख व भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

# नगराध्यक्षपदासाठी अध्याप एकही अर्ज नाही

पान १ वरुन

नामनिर्देशन पत्र (उमेदवारी अर्ज) दाखल करण्याची अंतिम मुदत रविवारी सुट्टी वगळता १७ नोव्हेंबरपर्यंत सकाळी ११ ते २ ऑनलाईन व सकाळी ११ ते ३ प्रत्यक्ष अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

निवडणुकीची प्रक्रिया पुढे सरकत असताना नगराध्यक्षपदासाठी कोण उमेदवार रिंगणात उतरणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



# सुधीर जगदाळे शिव राजमुद्रा समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

**मसूर/प्रतिनिधी : –**

मसूर, ता. कराड येथील समाजसेवा हीच ईश्वर सेवा सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष सुधीर उमेश जगदाळे यांना सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल ज्येष्ठ अभिनेते व दिग्दर्शक अनिल गवस यांच्या हस्ते शिव राजमुद्रा समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी तळबीड गावच्या सरपंच मृणालिनी मोहिते, हंबीरराव मोहिते, डॉ. राजकुमार घारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

वेणुताई चव्हाण सभागृह, कराड येथे झालेल्या सोहळ्यामध्ये हा पुरस्कार ओंजळ बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने प्रदान करण्यात आला. या सन २०२५ मध्ये समाजसेवक सुधीर जगदाळे यांना मिळालेला हा चौथा पुरस्कार आहे. यापूर्वी त्यांना स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने प्राइड ऑफ स्पंदन अवार्ड २०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

सुधीर जगदाळे हे नेहमी सामाजिक कार्यामध्ये सक्रिय असतात. त्यांच्या माध्यमातून आजपर्यंत हजारो लोकांना अन्नधान्याचा पुरवठा झालेला आहे विविध आश्रमांमध्ये ते अनाथ निराधार मुलांचा सांभाळ करत असतात. ज्या मुलांचे आई–वडील हयात नाहीत, अशा मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांनी स्वतःच्या खांद्यावर उचलून सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य त्यांच्या माध्यमातून अविरतपणे चालू आहे. गोरगरीब निराधार माता माऊलींना ते हॉस्पिटलसाठी आर्थिक मदत, धान्याचा पुरवठा ते करत असतात. आजपर्यंत त्यांनी त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून गोरगरीब महिलांना सहा हजार नवीन साड्यांचे वाटप केले आहे. तसेच वीस लाख रुपयांपर्यंत अन्नधान्याचा पुरवठा आजपर्यंत ३७८ कुटुंबांपर्यंत पोहोचवला आहे. असे अनेक सामाजिक व शैक्षणिक कार्य त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून करत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना ओंजळ बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या माध्यमातून हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.



# पंचरत्न करिअर अकॅडमीमध्ये मुंबई पोलीस अधिकारी लीलाधर पाटील यांचे मार्गदर्शन

**विटा / प्रतिनिधी:–**

पलूस येथील पंचरत्न करिअर अकॅडमीमध्ये दि. १४ नोव्हेंबर रोजी मुंबई पोलीस अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक लीलाधर पाटील यांनी पोलिस भरतीनिमित्त विद्यार्थी – विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन केले. अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष व कोच आर्मी कमांडो अस्लम मुल्ला सरांनी सपोनि लीलाधार पाटील यांचे स्वागत व मनापासून आभार मानले. यावेळी पाटील यांनी मुलांना आगामी भरतीसाठी शुभेच्छा दिल्या व मुल्ला सरांच्या अकॅडमीला दोन पुस्तके भेट दिली.

पंचरत्न करिअर अकॅडमी, पलूस मध्ये मुंबई पोलीस अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक लीलाधर पाटील हे मुंबईहून पलूसला मोलाचा वेळ काढून मुलांच्या भविष्याचा विचार करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आले होते. पंचरत्न करिअर अकॅडमीमध्ये त्यांनी मोलाचे मार्गदर्शन करून मुलांना प्रोत्साहित केले व मुलांचे मनोधैर्य वाढवले. यावेळी उपस्थित अकॅडमीमधील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या अखेरीस सहायक पोलिस निरीक्षक लीलाधर पाटील यांचे अकॅडमीतर्फे व विद्यार्थ्यांतर्फे आभार मानले.

## गणपतराव जाधव यांचे निधन

**ईश्वरपूर/प्रतिनिधी:–**



ईश्वरपुरातील नेहरूनगर परिसरातील सुतारकाम कारागीर गणपतराव बाबुराव जाधव (वय ७२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. फर्निचर व्यवसायिक सचिन जाधव यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात मुली, जावाई, सून,नातवंडे, भाऊ–भावजय असा परिवार आहे. रक्षाविसर्जन रवीवारी दि.१६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता कापूसखेड नाका येथे होणार आहे.

## मारहाण प्रकरणी परस्परविरोधी तक्रारी

**सातारा/प्रतिनिधी:–**

कारंडवाडी येथील बसस्टॉप जवळ एकमेकांना मारहाण केल्याप्रकरणी सातारा तालुका पोलीस ठाण्यात परस्परांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शिवीगाळ का केली, असे विचारल्याच्या कारणातून एकमेकांना हाताने, लाथा बुक्क्याने व दगडाने मारहाण करण्यात आली. याप्रकरणी रोहित तानाजी सावंत वय २२, सतीश बबन साळुंखे वय ४५, राज सतीश साळुंखे, आदित्य संतोष साळुंखे, तानाजी छत्रपती साळुंखे सर्व रा. कारंडवाडी यांनी एकमेकांविरोधात तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून परस्पर विरोधी तक्रारी दाखल करण्यात आल्याची माहिती तालुका पोलीसांनी दिली आहे.

# यशोदा इन्स्टिट्यूट मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**सातारा/प्रतिनिधी:–**

यशोदा टेक्निकल कॅम्पस, सातारा येथे भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन आणि स्मरण सोहळा उत्साहात व अभिमानाने साजरा करण्यात आला. देशाच्या प्रगतिशील विचारांचे, आधुनिक भारताच्या पायाभरणीचे आणि बालप्रेमाचे प्रतीक असलेल्या नेहरूंच्या कार्याची उजळणी या कार्यक्रमात करण्यात आली.

या विशेष कार्यक्रमाला प्रा. दशरथ सगरे, डॉ. व्ही. एस. पाटील, डॉ.आर.डी.मोहिते, गणेश सुरवसे, तसेच यांसह संस्थेतील अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात नेहरूंच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून



यशोदा इन्स्टिट्यूट मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांना जयंतीनिमित्त अभिवादन करताना प्रा.दशरथ सगरे, डॉ.व्ही. एस. पाटील, डॉ.आर.डी. मोहिते,श्री गणेश सुरवसे तसेच यांसह संस्थेतील अधिकारी,प्राध्यापक,कर्मचारी व विद्यार्थी

करण्यात आली. त्यानंतर त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाची, वैज्ञानिक विकासावर दिलेल्या भराची आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

पंडित नेहरूंनी आधुनिक भारताचे जे स्वप्न पाहिले, ते साकार करण्यासाठी शिक्षण व तंत्रज्ञान क्षेत्राची भक्कम पायाभरणी केली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन प्रगत भारत निर्मितीमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

प्रा. दशरथ सगरे यांनी नेहरूंच्या वैज्ञानिक दृष्टिकोन, राष्ट्रनिर्मितीतील योगदान आणि युवांना दिलेला संदेश अधोरेखित केला. संस्थेतील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी विविध माध्यमातून नेहरूंच्या कार्यावर आधारित सादरीकरणे करून आपली कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी 'चाचा नेहरू' यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प करण्यात आला. देशाच्या प्रगतीत शिक्षण आणि तंत्रज्ञानाची भूमिका अधोरेखित करत हा स्मरण सोहळा प्रेरणादायी वातावरणात पार पडला.


# आज का अंदाज

**शनिवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२५**

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| ३ - ६ - ९ - ० | ३ - ४ - ७ - ८ |
| २२९-१२३-९००-२३५ | १३९-६९९-१७९-४४० |
| १२०-६००-२३४-१९० | २३८-४००-२७८-५५८ |
| ३३७-७९०-४५०-३८९ | ३३७-२२०-३७७-३५० |
| **जोडी** | **जोडी** |
| ३१ - ६१ - ९४ - ०४ | ३२ - ४२ - ७१ - ८१ |
| ३५ - ६५ - ९८ - ०८ | ३६ - ४६ - ७५ - ८५ |
| ३७ - ६७ - ९२ - ०२ | ३० - ४० - ७९ - ८९ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि.१५-१६ नोव्हेंबर
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

**शनिवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२५**

| सर्व बाजार साठी | | | | |
|---|---|---|---|---|
| | १३ | ४३ | ५० | ८० |
| | १६ | ४६ | ५२ | ८२ |
| | १९ | ४९ | ५७ | ८७ |
| | १२८ | १५८ | १४० | १८९ |
| | २९० | २५७ | २६७ | ३७८ |
| | ५७९ | ६८० | ३६६ | २२४ |

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

| सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन डे | सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन नाईट |
|---|---|
| १९० २८० ३७० **०** ४७८ ३७९ २७० **९** १३९ २३८ ३३७ **३** | ४७० ५६० ३८० **१** ४८० ५७० ६६० **२** २६० ३५० ४४० **८** |
| **सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लोज डे** | **सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लोज नाईट** |
| १४९ २४८ ३४७ **४** ९०० ४५० ३६० **९** ३४० २५० १६० **७** | ३७७ २७८ १७९ **७** १८९ २८८ ३७८ **८** ४५० ५५९ ६६७ **९** |
| **सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन डे** | **सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन नाईट** |
| ३४६ २२९ १२० **३** ४५६ ६९० ७८० **५** १२३ २६८ ३६७ **६** | २०० ३९० ४८० **२** ४४६ ५९० ६८० **४** ६०० १५० २४० **६** |
| **सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज डे** | **सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज नाईट** |
| ५७० ६७९ ७७८ **२** ३५५ ५९९ ४९० **३** १४९ २५७ ७८९ **४** | १२० ३०० ५८० **३** १७८ ३५८ २७७ **६** २३४ ४५० ५६८ **९** |

**सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज**

१ - ० - ९ - ८
७

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि. ११-११-२०२५ १३-११-२०२५ १५-११-२०२५
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# येळगाव जिल्हा परिषद गटात चर्चेला उधान

उंडाळे/प्रतिनिधी: –

मिनी विधानसभा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका जाहीर झाल्यानंतर कराड तालुक्यातील विविध जिल्हा परिषद गटांमध्ये इच्छुक उमेदवारांची चाचपणी सुरू झाली असून, राजकीय वातावरणात चैतन्य निर्माण झाले आहे. येणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर इच्छुकांकडून मोर्चेबांधणीला वेग आला असून, दसरा-दिवाळीच्या सणानंतर मतदारांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

येत्या निवडणुकीत येळगाव जिल्हा परिषद गट सर्वसाधारण खुला, तर पंचायत समितीसाठी येळगाव गण महिला राखीव आणि सवादे गण सर्वसाधारण खुला असा आराखडा असल्याने या गटांमध्ये निवडणुकीची रंगत वाढणार आहे.



पूर्वीचा इतिहास पाहता, येळगाव जिल्हा परिषद गट, तसेच येळगाव आणि सवादे गण हे काँग्रेसचे बालेकिल्ले मानले जात होते. मात्र माजी मंत्री स्व. विलासराव पाटील उंडाळकर यांच्या निधनानंतर या गटांमध्ये विरोधी गटांची घुसखोरी वाढली आहे. त्यामुळे गावागावात गटतटांचे राजकारण तीव्र झाले असून, कार्यकर्त्यांची ये-जा वाढली आहे.

**जि.प. व प.स निवडणूक रणसंग्राम**

तसेच ॲड. उदयसिंह पाटील आणि त्यांचे बंधू ॲड. आनंदराव पाटील यांच्या गटांतील दुहीमुळे उंडाळकर समर्थकांत विभागणी झाल्याचे दिसून येते. काही महिन्यांपूर्वी रयत साखर कारखान्याचे माजी चेअरमन ॲड.उदयसिंह पाटील यांचे चुलते आणि ॲड.आनंदराव पाटील यांचे वडील स्व.जयसिंगराव पाटील यांच्या निधनानंतर या दोन गटांतील कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे.

दरम्यान, भाजपच्या माध्यमातून आ.डॉ.अतुलबाबा भोसले हे येळगाव गटातील गावोगावी मोर्चेबांधणी करत असून, सावध पण ठोस पवित्रा घेत आपल्या गटाची ताकद वाढवताना दिसत आहेत. शासनाच्या विविध योजनांमधून त्यांनी तळागाळातील जनतेमध्ये आपले कार्य ठळकपणे दाखवले आहे.

येळगाव गट खुला झाल्याने इच्छुकांची संख्या वाढली असून, अनेकांची नावे दबक्या आवाजात चर्चेत आहेत. काही इच्छुकांनी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांशी भेटीगाठी वाढवल्या आहेत. शेवटी मात्र, स्थानिक नेते आणि पक्ष नेतृत्वाची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

### अतुलबाबा भोसले बाजी मारणार?

अल्पावधीत आपल्या कार्याची छाप उमटवणारे आ. डॉ. अतुलबाबा भोसले यांनी येळगाव व सवादे गणामध्ये विविध योजना, कार्यक्रम राबवत कार्यकर्त्यांचा मजबूत गट उभा केला आहे. त्यामुळे काँग्रेसच्या पारंपरिक बालेकिल्ल्यात ते 'बाजी मारणार का? हा प्रश्न आता राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

### दोन उंडाळकर एकत्र येणार का?

गत जिल्हा परिषद निवडणुकीत उंडाळकर गटात दोन शक्कले पडल्याने दोन्ही युवा नेते एकमेकांसमोर उभे ठाकले होते. मात्र काळाच्या ओघात अनेक घडामोडी झाल्याने आगामी निवडणुकीत हे दोन्ही गट पुन्हा एकत्र येऊन लढतील का? याबाबत चर्चांना उधाण आले आहे.

# विट्यात राजकीय वातावरण तापले

## दिग्गजांकडून अर्ज दाखल ;बाबर-पाटील गटात चुरस

विटा/ प्रतिनिधी:–

विटा नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी शहरातील अनेक दिग्गजांनी अर्ज दाखल केल्याचे दिसून आले. ड. मिलिंद कदम, संजय सपकाळ, मंगेश हजारे यांच्या पत्नी अंबिका हजारे, ड.तानाजी जाधव यांच्या पत्नी, मुकुल तारळेकर, कन्हैया बाबर, ड. धर्मेश पाटील यांच्या पत्नी, संजय भिंगारदेवे तसेच अनेकांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. मोठ्या शक्तीप्रदर्शनासहीत अनेक जण विटा नगरपालिकेच्या दालनात उपस्थित होते. यावेळी अनेकांनी विजयाच्या घोषणा दिल्या. बाबर – पाटील गटात मोठी चुरस असल्याचे दिसून आले.

यावेळी शक्तीप्रदर्शन करताना उमेदवारांच्या कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्या. यावेळी प्रभाग क्र. ३ चे उमेदवार संजय सपकाळ यांनी ठाम विश्वास व्यक्त केला की, नगरपालिका निवडणुकीत विटा शहरात भाजपचाच विजय होईल. नगराध्यक्षा भाजपा पक्षाचीच होणार आहे. प्रभाग क्र. १३ चे भाजपचे उमेदवार प्रशांत कांबळे म्हणाले की, प्रभाग क्रमांक १३ मधील जनता आमच्या मागे विकासाच्या दृष्टिकोनातून पाठीशी आहे. जनतेचा विकास हे आमचे उद्दीष्ट आहे.




विटा नगरपालिकेत निवडणुकीसाठी अर्ज दाखल करताना नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने येत असल्यामुळे निवडणुकीचे वातावरण शहरात तयार झाले आहे.

तसेच उमेदवारांच्या मतदारांशी भेटीगाठी वाढल्या आहेत. निवडणुका आल्या की, नमस्कार, खुशाली विचारून उमेदवार जनतेशी संपर्क करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसत आहे. सर्वत्र वातावरण भगवेमाय झाल्याचे दिसत आहे.

# उरमोडी च्या काठावर राजकीय चर्चेचा काथ्याकुट

## नगराध्यक्षपदाच्या उमेदवारावर सहमती होईना ; काही प्रभागातील उमेदवारीचा निर्णय प्रलंबित

सातारा/प्रतिनिधी:–

सातारा पालिकेत राजकीय मनोमिलन बाजूला ठेवून आपण सर्व भाजपचे असा अभिनिवेष सध्या दोन्ही राजांनी घेतला आहे. दोन्ही राजांच्या उरमोडी धरणाच्या काठावरील राजकीय चर्चेमध्ये नगराध्यक्ष पदाच्या मुद्द्यावर चर्चेचा काथ्याकुट झाला. नगराध्यक्ष हा लोकाभिमुख व प्रशासनावर नियंत्रण ठेवणारा असावा या विषयावर जरी एकमत झाले तरी तो कोण? या मुद्द्यावर दोन्ही राजांचे बराच काळ चर्चा होऊ नये एकमत होऊ शकले नाही . याशिवाय काही प्रभागातील उमेदवारी आणि तेथील राजकीय समीकरणे याबाबतही निर्णय प्रलंबित राहिला आहे.

खासदार उदयनराजे भोसले व सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची साताऱ्याचा नगराध्यक्ष आणि उमेदवारांची अंतिम यादी या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सातारा तालुक्यातील उरमोडी धरणाच्या काठावर एका फार्म हाऊस वर राजकीय चर्चेची पहिली बैठक शुक्रवारी दुपारनंतर रंगली. या बैठकीला लोकसभा संयोजक सुनील काटकर सातारा विकास आघाडीचे माजी पक्षप्रतोद दत्तात्रय बनकर, सातारा विधानसभा संयोजक अविनाश कदम नगर विकास आघाडीचे पक्षप्रतोद अमोल मोहिते इत्यादी यावेळी उपस्थित होते .उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आता रविवार वगळता केवळ २४ तास उरले आहेत. बंडखोरी टाळण्यासाठी दोन्ही आघाड्यांनी एबी फॉर्म राखून ठेवत अंतिम उमेदवारांची यादी सुद्धा गुलदस्त्यात ठेवली आहे .त्यामुळे इच्छुक नगरसेवकांचा जीव टांगणीलालागला असल्याने नक्की साताऱ्याचे राजकीय समीकरण कोणते वळण घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते.

कार्यकर्त्यांच्या भावना आणि त्याची तीव्रता लक्षात घेऊन दोन्ही राजांनी दुपारनंतर उरमोडी धरणाच्या शांत परिसरात राजकीय चर्चा करण्याचे ठरवले आणि त्यानुसार बैठकीला सुरुवात करण्यात आली. सातारा विकास आघाडीचे कट्टर नगराध्यक्ष पदाच्या स्पर्धेतील उमेदवार संग्राम बर्गे अविनाश कदम अमोल मोहिते यांच्या नावावर दोन्ही राजांच्या मध्ये चर्चा करण्यात आली.

मात्र नगराध्यक्ष पदाच्या सातारा विकास आघाडीच्या प्रस्तावाला शिवेंद्रसिंह राजे यांनी विरोध केल्याची माहिती आहे .तसेच प्रभाग क्रमांक आठ नऊ व २१ येथील उमेदवारी निश्चिती याबाबतही चर्चा झाली .प्रभागाची आरक्षणे आणि इच्छुक उमेदवारांचे इलेक्टिव्ह मेरिट याबाबतही दोन्ही राजांनी बरेच मुद्दे मांडले.

साताऱ्याचा लोकमान्य व राजमान्य नगराध्यक्ष कोण याबाबत एकमत न झाल्याने पुन्हा एकदा राजकीय चर्चेची दुसरी फेरी होऊ शकते असा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे .बैठकीमध्ये झालेले निर्णय सुद्धा गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहेत साताऱ्याचे नगराध्यक्षपद नेमके कोणाकडे जाणार असा प्रश्न उपस्थित झाल्याने दोन्ही आघाड्यांचे भावी नगरसेवक संभ्रमित झाले आहेत.

# उरूण-ईश्वरपूर नगरपालिकेचा नगराध्यक्ष भाजपचा होईल

## ना. चंद्रकांत पाटील

ईश्वरपूर/प्रतिनिधी:–

उरूण- ईश्वरपुरच्या भुयारी गटार योजनेसाठी १९८ कोटी तर २४ बाय ७ पाणी योजनेसाठी १२४ कोटी रुपये मंजूर केले आहेत. लवकरच या योजना सुरू होतील.

महायुतीला पालिकेत सत्ता द्या महिलांना सक्षम बनवण्यासाठी बचत गटाच्या योजना आणू. भाजप हा वैयक्तिक खाजगी पक्ष नसून तो सर्वसामान्य लोकांचा पक्ष आहे. उरुण- ईश्वरपूर नगरपालिका निवडणुकीत भाजपचाच नगराध्यक्ष होईल असा विश्वास पालकमंत्री ना. चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला.

ते लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विश्वनाथ डांगे यांच्या प्रचार शुभारंभ सभेच्या निमित्ताने जाहीर सभेत बोलत होते. यावेळी आ. सदाभाऊ खोत, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष निशिकांत पाटील , भाजप जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, भाजप सरचिटणीस राहुल महाडिक, ॲड चिमनभाऊ डांगे, जयवंत पाटील, वैभव पवार, विक्रमभाऊ पाटील, सी. बी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

पंचायत समिती पासून रॅलीला सुरुवात झाली. यल्लामा चौकात येऊन रॅलीचे प्रचार सभेत रुपांतर झाले. सभा झाल्यानंतर नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विश्वनाथ डांगे यांचा उमेदवारी अर्ज पालकमंत्री ना. चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत दाखल केला.

ना. चंद्रकांत पाटील म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी विक्रमभाऊ पाटील म्हणाले, माझ्याबद्दल वेगवेगळ्या बातम्या आल्या. परंतु मी जिवंत असेपर्यंत भाजप सोडून कुठेही जाणार नाही. आपण सर्वांनी ताकतीने निवडणूक लढवायची आहे आणि जिंकायची आहे.

सम्राट महाडिक म्हणाले , आमची महायुती तुटणार असे काहीजण म्हणत होते. पण आमची महायुती एकसंघ आहे. विरोधकांना उमेदवार मिळत नाहीत अशी परिस्थिती आहे . नगराध्यक्ष पदासाठी आपण एक तरुण उमेदवार बापूंच्या




रूपाने दिला आहे. चंद्रकांतदादांनी आमचं उरूण ईश्वरपूरच स्वप्न पूर्ण केले. विरोधकांनी गफलत करण्याचा प्रयत्न केला. विरोधकांनी तीस वर्षाच्या कालावधीत हजारो कोटी रुपये निधी आणला. मग तो कुठं जिरवला. विरोधक म्हणत होते हिंमत असेल तर कमळ चिन्ह घेऊन दाखवा जयंतराव पाटील तुमचं आव्हान स्वीकारले आणि कमळ चिन्हावरतीच नगराध्यक्ष पदाचा उमेदवार उभा केला आहे.

निशिकांत पाटील म्हणाले, नगरपालिका म्हणजे या नगराचे प्राधिकरण असते. गेले पाच वर्षाचा कारभार आणि ३५ वर्षाचा कारभार प्रचारादरम्यान मी मांडणार आहे . या विरोधकांनी शहराला विकासापासून वंचित ठेवण्याचे काम केले. भुयारी गटर योजना , २४ बाय ७ पाणी योजना ही विरोधकांच्या आडमुठेपणामुळे पूर्ण करता आली नाही.

आ. सदाभाऊ खोत म्हणाले, ही निवडणूक ऐतिहासिक होणार आहे. सर्वसामान्य लोकांच्या भावना ओळखून आधी केले मग सांगितले.ना. चंद्रकांतदादा पाटील हे शहराचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी काम करत आहेत. ४९ वर्षे तुमची सत्ता होती मग तुम्ही उरूण ईश्वरपूर का केले नाही. उरूणवाशीयांचा यांनी अपमान केला. २० वर्षे तुम्ही मंत्री होता तुम्ही पैसे लुटण्यासाठी सत्तेचा वापर केला. प्रत्येक गोष्टीत राजकारण का आणता या नगरपालिकेवरती महायुतीचा झेंडा फडकेल.

या सभेचे स्वागत प्रास्ताविक शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष आनंदराव पवार यांनी केले. यावेळी रयत क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सागर खोत, मस्जि नगरसेवक कपिल ओसवाल, शिवसेना तालुकाध्यक्ष सागर मलगुंडे आदी उपस्थित होते.

### आजअखेर नगराध्यक्ष..

पान १ वरुन

नारायण इंगवले – अपक्ष, प्रभाग ६ (सर्वसाधारण) : सुरज शंकर शेवाळे – भारतीय जनता पक्ष, प्रभाग ७ (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव) : पूजा गणेश चव्हाण – भारतीय जनता पक्ष, प्रभाग १० (नागरिकांचा मागास प्रवर्ग) : प्रमोद माणिकराव शिंदे – भारतीय जनता पक्ष व याच प्रभागातील सर्वसाधारण महिला जागा : सुनिता भगवान पाटील आणि प्रियांका योगेश शिंदे – यांनीही भारतीय जनता पक्षातून आज दाखल केला आहे.

दरम्यान, शनिवार (रविवार सुट्टीचा हा दिवस वगळता) आणि सोमवार हे दोनच दिवस उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मुदत बाकी असल्याने या दोन दिवसात अर्ज भरण्यासाठी इच्छुकांची गर्दी पाहायला मिळणार आहे.


# शिरवळ येथील किरण मोरे दोन जिल्ह्यातून हद्दपार

## प्रांताधिकारी डॉ.योगेश खरमाटे यांचा आदेश

वाई/प्रतिनिधी:–

सध्या रा.शिरवळ (ता. खंडाळा) मूळ रा.कर्णावड ता.भोर जि.पुणे येथील युट्युब पत्रकार म्हणून ओळख असलेला किरण प्रकाश मोरे (वय ३७) यास पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या हद्दीतून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले आहे.हा आदेश उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, वाई विभाग,डॉ.योगेश खरमाटे यांनी दिला आहे.

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, किरण मोरे याच्यावर शिरवळ पोलीस ठाण्यात विविध कलमांखाली तीन गंभीर गुन्हे दाखल



आहेत. त्यामध्ये स्त्रीचा सन्मान भंग करणे, मारहाण, धमकी देणे तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्ह्यांचा समावेश आहे. गुन्हे दाखल असूनही त्याच्या वर्तनात सुधारणा न झाल्याने पोलिसांनी त्याच्यावर हद्दपारीचा प्रस्ताव तयार केला होता.

सदर प्रस्तावावर सुनावणीदरम्यान चौकशी अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, फलटण विभाग, श्री.विशाल खांबे यांनी केलेल्या शिफारशीनुसार हा आदेश पारित करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री.तुषार दोशी, अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी फलटण विभाग श्री.विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली,शिरवळ पोलीस निरीक्षक श्री. यशवंत नलवडे यांच्या प्रयत्नांतून करण्यात आली.

दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, हद्दपार इसम किरण प्रकाश मोरे अथवा त्याचे साथीदार विशाल महादेव जाधव व इरफान दिलावर शेख यांनी जर कोणत्याही प्रकारे धमकी दिल्यास किंवा पैशांची मागणी केल्यास, निर्भयपणे शिरवळ पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी. तक्रारदाराचे नाव व पत्ता गोपनीय ठेवण्यात येईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### विवाहितेचा विनयभंग केल्याप्रकरणी दोघावर गुन्हा

सातारा/प्रतिनिधी:–

विवाहितेचा विनयभंग केल्याप्रकरणी दोन जणांविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १७ ऑक्टोबर रोजी दुपारी पावणेपाच ते पाच वाजण्याच्या दरम्यान एका विवाहितेचा विनयभंग केल्याप्रकरणी समीर शेख, सलीम शेख दोघेही रा. यादोगोपाळ पेठ सातारा यांचे विरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### दारूच्या नशेत गळफास लावून घेत संपवले जीवन

सातारा/प्रतिनिधी:–

पाटखळमाथा येथे सचिन वसंत महापुरे(वय३९) यांनी दारूच्या नशेत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. त्यांना उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.घटनेची माहिती सुनील वसंत महापुरे(वय ४२) यांनी तालुका पोलिसांत दिली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

तर दुसऱ्या घटनेत खेड येथील अक्काबाईचा मळा येथील नदीच्या कडेला असलेल्या करंजाच्या झाडाला दोरीच्या साहाय्याने नितीन श्रीधर जाधव (वय ५६) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली.याची फिर्याद उद्धव श्रीधर जाधव(वय ४९) यांनी सातारा शहर पोलिसांत दिली आहे.अधिक तपास पोलीस हवालदार यादव करत आहे.

# शाहूपुरी पोलिसांकडून बॅटऱ्या चोरणाऱ्या आरोपीला अटक

## दहा बॅटऱ्या केल्या हस्तगत ; चोवीस तासात गुन्हा केला उघड

सातारा/प्रतिनिधी:–

करंजे पेठ येथील रहिवासी रमेश रघुनाथ शेडगे (वय ३९) यांनी दि.५ रोजी झेड पी कॉलनी, म्हसवे रोड येथे अमोल गार्डे यांच्या घरासमोर उभ्या केलेल्या ट्रकवरील १५ हजार रुपये किमतीच्या बॅटऱ्या चोरीची फिर्याद शाहूपुरी पोलिसांत दिली होती,त्यानुसार शाहूपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन म्हेत्रे यांच्या सूचनेनुसार पोलीस स्टेशनचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आरोपीचा शोध घेत असताना गोपनीय बातमीदार आणि फिर्यादीच्या माहितीनुसार सदर गुन्हा त्यांच्या परिसरात राहणाऱ्या इसमानेच केला



असल्याची माहिती मिळाली. त्याअनुषंगाने पोलिसांनी आरोपीचा शोध घेऊन त्याच पकडून अटक केली. दत्ता बबन ठोंबरे (वय ३३वर्ष) रा. पिल्लेश्वरीनगर, करंजे असे अटक केलेल्या संशयितांचे नाव आहे. त्याच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्याने गेल्या तीन महिन्याच्या कालावधीत वाढे फाटा, करंजे परिसरात उभ्या असलेल्या चारचाकी वाहनातून चोरलेल्या गुन्ह्यातील दोन बॅटऱ्या व इतर चारचाकी वाहनांच्या आठ अशा एकूण ५५ हजार रुपये किमतीच्या १० चारचाकी गाड्यांच्या बॅटऱ्या हस्तगत केल्या असल्याची माहिती शाहूपुरी पोलिसांनी दिली. या गुन्ह्याचा तपास महिला पोलीस हवालदार सोनाली माने करीत आहेत.

# सर्वात जास्त लीडने येण्याचा निर्धार बाळगत संजय सपकाळ यांनी दाखल केला प्रभाग ३ मधून अर्ज

## भाजपकडून ओपन पुरुष गटातून सपकाळ तर ओपन स्त्री गटातून अंबिका हजारे निवडणुकीच्या रणांगणात

विटा/ प्रतिनिधी:–

विट्यातील लोकप्रिय उमेदवार संजय सपकाळ यांनी भाजपातर्फे नगरपालिकेच्या निवडणुकीत नगरसेवकपदासाठी प्रभाग क्र. ३ मधून उमेदवारी अर्ज दाखल केला. भाजपाचाच नगराध्यक्ष होणार, अशी डरकाळी संजय सपकाळ यांनी फोडली आहे. प्रभाग क्र. ३ मधून पुरुष ओपन गटातून सपकाळ यांनी अर्ज दाखल केला तर महिला ओपनमधून सौ. अंबिका हजारे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

संजय सपकाळ व अंबिका हजारे हे भाजपचे दोन्ही उमेदवार प्रभागातील घराघरांत पोहोचले आहेत. या दोन्ही उमेदवारांना निवडून



आणण्याचा निश्चय प्रभागातील भाजपा कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. अंबिका हजारे यांनी प्रभागातील महिलांचे संघटन केले आहे. संजय हजारे हे प्रभागातील सर्वांशी मिळूनमिसळून वागणारे व्यक्तीमतव आहे. जेव्हा प्रभात उमेदवारी कोणाला द्यायची हा प्रश्न निर्माण झाला होता, त्यावेळेस प्रभागातील कार्यकर्त्यांनी संजय काकांनाच उमेदवारी द्या, अन्यथा परिणामांस सामोरे जा, असा इशारा पक्षाला दिला होता. संजयकाका सपकाळ आणि अंबिका हजारे मोठ्या मताधिक्क्याने निवडून येतील, अशी अशा प्रभागातील भाजपाच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

संजय सपकाळ आणि अंबिका हजारे यांचा प्रभागात अनेक वर्षांपासून संपर्क आहे. प्रभागातील अनेक प्रश्न या दोघा उमेदवारांनी सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. संजय काका सपकाळ आणि अंबिका हजारे यांनी नगरसेवकपदासाठी अर्ज दाखल केला आहे, परंतु त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

**SRM E-TENDER NOTICE (T-6) (1st call)/2025-26)**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL EHV PC O&M Zone, Karad invites online bids from reputed and registered bidders on Mahatransco SRM E-Tendering website https://srmetender.mahatransco.in/ for following works:-

Tender for the Work of 220 KV Main bus and 220 KV auxiliary bus strengthen work at 220/110/33 KV Tilawani (Ichalkaranji) Sub-station, Sub-station under EHV O&M Division Kolhapur under EHV PC O&M Zone, Karad. **RFx. No.7000037618.** The Estimated amount for the said tender is Rs. 63,51,123/- Including Taxes) and due date for submission is 30.11.2025, 10:00 Hrs.

For further details visit our above said website.

Sd/-
Chief Engineer
EHV PC O&M Zone, Karad.




# परंपरागत शेतीवर अवलंबून न राहता शेतमालावर प्रकिया काळाची गरज

## पालकमंत्री चंद्रकांतदादा : १४.३९ कोटींच्या खरेदी विक्रीबाबत करार

सांगली/ प्रतिनिधी:–

परंपरागत शेतीवर अवलंबून राहू नका. शेतीपूरक व्यवसाय सुरू केल्याशिवाय शेतकऱ्याचे उत्पन्न वाढणार नाही. शेतमालावर प्रकिया ही काळाची गरज असून, त्यासाठी शेतकऱ्यांनी नवनवीन प्रयोग केले पाहिजेत, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे केले.

सांगली पॅटर्न - चला शेतकऱ्याला व्यापारी करू या घोषवाक्यासह आयोजित उत्पादक खरेदीदार (बायर-सेलर मीट) संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. दीपायन हॉल येथे आयोजित या कार्यक्रमास कृषि आयुक्त सूरज मांढरे व अपेडाचे संचालक डॉ. परशुराम पाटील हे दूरदृश्यप्रणालीद्वारे तर प्रत्यक्षात जिल्हाधिकारी अशोक काकडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, पणन संचालक विकास रसाळ, अपेडाचे प्रादेशिक प्रमुख प्रशांत वाघमारे, विभागीय कृषि सहसंचालक बसवराज मास्तोळी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी विवेक कुंभार, जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील, कृषि उपसंचालक धनाजी पाटील, सर्व उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी आदि उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, उत्पादक खरेदीदार संमेलनातून शेतकरी, व्यापारी व निर्यातदार यांना थेट संवादाची संधी उपलब्ध होत आहे. शेतीमाल निर्यात क्षेत्रात शेतकरी महिलांनाही प्रोत्साहन द्यावे. अशा संधी उपलब्ध होण्यासाठी अपेडाने पुढाकार घेऊन त्यांना मार्गदर्शन करावे, असे त्यांनी यावेळी सूचित केले. यावेळी त्यांनी स्वानुभवाचे विविध दाखले देत शेतीमधील स्वप्रयोगांची माहिती दिली. तसेच, संमेलनाच्या आयोजनाबद्दल जिल्हाधिकारी अशोक काकडे व कृषि विभागाचे अभिनंदन केले. जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, कृष्णाकाठच्या व येरळा, वारणा आदि उपनद्यांच्या परिसरात वसलेल्या सांगली जिल्ह्यातील नररत्नांनी स्वातंत्र्य संग्रामात प्राणाची आहुती दिली आहे. जिल्ह्याला राजकीय, सांस्कृतिक, साहित्य, क्रीडा, कृषि क्षेत्रात मोठा वारसा आहे. या सर्वांनी सांगली जिल्ह्याला आकार दिला आहे. शेती सांगलीची शान असून, इथल्या द्राक्ष, डाळिंब, केळी, ड्रॅगनफ्रुट आदिंना बाजारपेठेत मोठी मागणी आहे. त्याचा लाभ होऊन इथल्या शेतकऱ्याचे उत्पन्न वाढेल, या हेतूने हे संमेलन आयोजित केले आहे.




या उत्पादक खरेदीदार कृषि संमेलनातून केवळ एकच दिवस नव्हे तर दोघांतही नियमित सकारात्मक संवाद व्हावा. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी सदैव राहील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी या उपक्रमाबद्दल संयोजकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. तसेच, सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करण्यात या संमेलनाचे योगदान राहील, असे सांगून त्यांनी आपण पाहिलेले हे सर्वोत्तम संमेलन असल्याचे सांगितले. यावेळी अपेडाचे संचालक डॉ. परशुराम पाटील, पणन संचालक विकास रसाळ, अपेडाचे प्रादेशिक प्रमुख प्रशांत वाघमारे, विभागीय कृषि सहसंचालक बसवराज मास्तोळी, मित्राचे केदार पवार, अग्रणी बँक व्यवस्थापक विश्वास वेताळ, पशुसंवर्धन उपयुक्त अजयनाथ थोरे, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक विद्या कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक विवेक कुंभार यांनी केले. आभार राजेश शहा यांनी मानले. सूत्रसंचालन प्रवीण बनसोडे यांनी केले. रोपट्यास जल अर्पण करून कार्यक्रमाची सुरवात झाली. तसेच, कृषि विभागाने तयार केलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.